# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक ७ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१जानेवारी २०१२ पाने १६ किंमत २० रूपये

## माहितीचा अधिकार वापरा व लढा प्रदूषणाच्या राक्षसांला शिकवा धडा



**खराब काम करुन ठेकेदार मस्त, प्रशासन सुस्त माहिती अधिकारामुळे झाला पुन्हा फुटपाथ दुरुस्त**

## रेडिमेड प्रश्नावली



**सरकारी विभागांना काय व कोणती माहिती मागावी ?**



## होय, हे सत्य आहे

## आम्ही पाचशे कोटी मुड्द्यांसाठी समाधीस्थळ बांधतोय !

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

नागरिक अधिकार या मासिकासाठी स्वराज बहुउद्देशीय संस्था,खारघर नवी मुंबई यांच्याकडून छपाई व वितरणासाठी अर्थसाहय उपलब्ध झाले आहे.

## संपादकीय...........

## “बारामध्ये वाजवा दुष्टांचे व भ्रष्टांचे बारा”

२०१२ या वर्षाची सुरूवात झाली आहे. हे नवे वर्षे सर्व सज्जन व सदाचारी मंडळींना सुखाचे व समृद्धीचे जावो ही सदिच्छा.

२०११ हे वर्ष देशाच्या व सर्व जगाच्या सार्वजनिक जीवनात अनेक उलथा-पालथी करणारे ठरले.आपल्या देशात भ्रष्टाचाराविरोधात सामान्य जनतेचा आवाज मोठा बुलंद झाला.मा.अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली देशातील जनता भ्रष्ट प्रवृततीच्या विरोधात रस्त्यावर आली.देशभर सामान्य माणसांच्या चैतन्यरूपी शक्तीचा अविष्कार धरणे,मोर्चे ,आंदोलने यातून पाहायला मिळाला. देशात एक नवा आशेचा किरण पाहायला मिळाला.आता या किरणांच्या एकजूटीतून देशातील भ्रष्टाचार व आनागोंदीचा अंधकार दूर होईल आणि सज्जन शक्तीचा धाक असणारी एक सरळ व सहज राजकीय व्यवस्था प्रस्तापीत होईल ही अपेक्षा घेऊन नवे २०१२ हे वर्ष आले आहे अशी अपेक्षा करणे मुळीच अप्रस्तूत होणार नाही.

या देशाच्या संविधानाने या देशातील सामान्य माणसांना खूप मोठी शक्ती व अधिकार प्रणाली दिलेली आहे. या लोकशक्तीचा अधिकाधिक विधायक वापर करून लोकसमुहांच्या दबावातून एक सुंदर व सशक्त अशी व्यवस्था निर्माण करणे या साठी या वर्षात जनशक्तीला सुप्तपणे आपल्या क्षमता अधिक विकसीत कराव्या लागतील. देशभर उसळलेल्या जनशक्तीला व वर्षभर जनलोकपालच्या निमित्ताने निर्माण झालेल्या मंथनाला एक विशेष अशी दिशा द्यावी लागेल. कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण हा मुख्य अजेंडा ठरवून देशभर व्यापक प्रमाणात कार्यकर्त्यांचे जाळे विणावे लागेल.यासाठी एक मोठा व व्यापक जनप्रशिक्षण कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. नाही तर सामान्य जनतेचा सामुहिक क्षोभ क्षणिक असतो हे गृहित धरून राजकीय लोक २०११ च फेस २०१२ मध्ये जिरणारच आहे असे राजकीय गणित मांडून आपला लूटालूटीचा खेळ खेळण्यास सज्ज आहेत. लोकशाहीचे जागले म्हणून आपण सर्व सामान्य माणसांच्या सामान्य प्रतिनिधींनी कार्यकर्ता प्रशिक्षण व लोकप्रबोधनाची एक राष्ट्रव्यापी अशी मोहिम चालवायलाच हवी नाही तर येणारी पिढी आम्हाला माफ करणार नाही.

# माहितीचा अधिकार वापरा व लढा प्रदूषणाच्या राक्षसांला शिकवा धडा

लोकशाही मध्ये कायदयानुसार शासन व प्रशासन व्यवस्था चालवावीच लागते.सर्व समाजावर समाजातील सर्व लोकांवर ,प्रत्येक व्यक्तीवर कायद्याचा धाक असला तरच लोकशाही व्यवस्थेची फळे अधिकाधिक लोकापर्यंत पोहचतात.जर लोकशाहीत कायदे धाब्यावर बसविले गेले की लोकशाहीचे कळपशाहीत रूपांतर फार वेगात होते.आपल्या देशाात ठिकठिकाणी कायदे धाब्यावर बसविल्याने लोकशाहीचे रूपांतर कळपशाहीत झाल्याचे चित्र बहुतांश ठिकाणी दिसत आहे.पर्यावरणांचे रक्षण व्हावे म्हणून आम्ही आमच्या संविधानात सुधारणा करून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संकल्प केला आहे.परंतु या देशातील राज्यकर्त्यापासून ते सामान्य माणसा पर्यंत अपवाद वगळता या संकल्पाला कोणीही गंभीर पणे घेताना दिसत नाही. आज पृथ्वीवर झपाटयाने कार्बन उत्सर्जन होत आहे.वातावरणातील उष्णतेचे प्रमाण झपाटयाने वाढत आहे.ओझोन वायुचे अच्छादन विरळ होऊन विषारी सूर्यकिरणे पृथ्वीवर येऊ पाहत आहेत.पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांवरील बर्फ वितळून जगातील समुद्रकाठची महानगरे लवकरच जलसमाधी घेतील.तरीही आम्ही पर्यावरणाविषयी मनापासून प्रयत्न करताना दिसत नाहीत.

नागरी भागात वृक्षांचे जतन व्हावे म्हणून१९७५ मध्येच आम्ही कायदा केला आहे.परंतु आजही शहरात अनेक ठिकाणी राजरोस झाडांच्या कत्तली होत आहे.खरे तर दाटी-वाटीने उभारलेल्या महानगरामधील झाडे म्हणजे महानगरांची फुफुसे होत.परंतु महानगरातील झाडे, समुद्रकाठचे कांदळवन यांची कत्तल काही थांबत नाही.झाडे व झाडांच्या फांदया तोडण्यासाठी महानगरात महापालिकेच्या वृक्षप्राधिकरण समितीची सहमती घेणे आवश्यक असते.नगर पालिका स्तरावरही झाडे तोडण्यापूर्वी संबंधीत प्रशासनाची संमती घेवून योग्य ती कायदे शीर प्रक्रिया पूर्ण करावी लागते जल,नद्या,समुद्रकाठ,जैवसाखळी सगळेच काही आता मरणाच्या काठावर येवून ठेपले आहेत.यासबंधी कायदे फार कडक आहेत परंतु .सदर कायदयातील महत्वाच्या तरतूदी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी जाणून घेऊन प्रशासनाला व जनतेला सजग करण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले पाहिजे.झाडे वाचली तरच जीवन वाचेल शहरातील जमीनी संपल्या आहेत.मोकळी जागा दिसणे दुरापास्त झाले आहे.नवीन झाडे लावण्याचाखोटा उपचार जरी आम्ही करीत असलो तरी लावलेली झाडे जोपासण्याचे कर्त्यव्य आम्ही कधीच करीत नाही.त्यामुळे आता यापुढे केवळ वृक्षारोपणाचे कार्यक्रम फोटो काढण्यापुरते मर्यादित न ठेवता लावलेली झाडे मोठी करण्यासाठी आम्ही सर्वांनीच दक्ष राहिले पाहिजे.आता विनााश जवळ येऊ पाहत असताना आम्ही गाफील राहिलोतर आमची कुऱ्हाड आमच्याच अंगावर चालविणारे शेख चिल्ली आम्हीच असणार आहोत.

# वाचवा वसुंधरा,निसर्गाची कास धरा

प्रेम करणे ही कला आहे परंतु प्रेम टिकविणे ही साधना आहे.

## आपल्या परिसरातील महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील वृक्षांच्या संबंधी माहिती मागविण्यासाठी नमूना अर्ज

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

महानगरपालिका /नगरपरिषद /नगरपालिका --------------

ता. ----------------- जि. ----------

१)अर्जदार-----------------------------------------------------------------------------

२) पत्ता : ----------------------------------------------------------------------------

३) माहितीचा विषय :आपल्या नगरपरिषद / नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वृक्षप्राधिकरण विभागातील माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)

१) सन.१९९६ नंतर आपल्या अधिकारीतेतील सर्व जमीनीवरील विद्यमान झाडांची गणना किती वेळा केली आहे ? शेवटच्यागणणेवळी आपल्या कार्यक्षेत्रातील जमीनीवरील झाडांची संख्या किती होती ?

२) महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण आणि जतन अधिनियम १९७५ च्या प्रकरण पाच कलम ८ पोटकलम (३) ख अन्वये वृक्ष प्राधिकरणाने सन २०१० पासून प्रत्येक सहा महिन्यात किती झाडे तोडण्यास परवानगी दिली याचा अहवाल सर्वसाधारण सभेत प्रत्येक सहा महिन्यास सादर केला आहे काय ? २००५ पासून किती झाडे तोडण्यास परवानगी दिली त्याची संख्या द्यावी.

३) महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण आणि जतन अधिनियम १९७५ तरतूदीचा भंग करून आपल्या प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातून २०१० पासून २०११ अखेरपर्यत किती लोकांनी झाडे तोडली ? अशा बेकादेशीर रित्या तोडल्या गेलेल्या झाडांची संख्या किती? अशा लोकांना काय शिक्षा झाली ? किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत ? किती रूपये दंड वसूल झाला ? दंडापोटी जमा झालेल्या रक्कमेचा कसा विनीयोग केला ?४)२०१० पासून २०११ अखेरपर्यंत आपल्या वृक्षप्रधिकरणाकडे झाडे तोडण्यासाठी किती अर्ज आले ? त्यातील किती झाडांना तोडण्याची परवानगी देण्यात आली ?त्यांच्याकडून किती रूपये ठेव जमा झाली ? झाडे तोडण्याच्या बदल्यात अर्जदारांना किती कोठे व कोणती पर्यायी झाडे लावण्यासंबंधीचे / दत्तक घेण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले ? वृक्षप्राधिकरणानाने जतन करण्याचा आदेश दिलेली नवीन झाडे अर्जकर्त्यांनी खरेच जतनकेली आहेत काय ? नसल्यास अशा किती अर्जदारांची किती ठेव रक्कम प्राधिकरणाने जप्त केली आहे ?

५) २०१० पासून २०११ अखेरपर्यंत आपल्या वृक्षप्रधिकरणाच्या किती बैठका झाल्या ? वृक्षप्राधिकरणाच्या सर्व सदस्याची नावे व पत्ते द्यावेत . यातील वृक्षाचे जतन व रोपण याचे विशेष ज्ञान असलेल्या बिगर सरकारी संस्थांचे /संघटनांचे किती प्रतिनिधी सदस्य म्हणून घेतले आहेत ? त्याची नावे व पत्ते द्यावेत .तसेच त्यांना प्रतिनिधी म्हणून नेमतांना कोणता पूर्वविचार झाला? या संबंधीची टिपण्णी किंवा अहवाल किंवा शेरा असल्यास त्याची एक सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : -------------------- (नाव -----------------)

मो.नंबर: ००००००००००

जगातील सर्वांत मागासलेला प्रदेश तुमच्या टोपीखाली तर नाही ना ? या विषयी नेहमी सावध रहा . आचार्य विनोबा भावे

रोखठोक मत

-सुभाष बसवेकर

# होय, हे सत्य आहे आम्ही आठशे कोटी मुडद्यांसाठी समाधीस्थळ बांधतोय

**ओझोन वायुचे अच्छादन विरळ होऊन विषारी सूर्यकिरणे पृथ्वीवर येऊ पाहत आहेत.पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांवरील बर्फ वितळून जगातील समुद्रकाठची महानगरे लवकरच जलसमाधी घेतील.लवकरच सेल्सीअस अंश मध्ये तापमान ५० अंश डिग्रीपेक्षा पुढे जाईल.जैवसाखळीतील अनेक महत्वांच्या प्रजाती नष्ट होत आहेत.एक दिवस मानवी जीव ही उरणार नाही.ग्लोबल वार्मिग च्या विखारी जाळात मानवी प्रजाती करपून नष्ट होईल.आम्ही गाफील राहिलो तर तो दिवस फार जवळ आहे.आम्ही आत्ता वेळीच सावध झालो तर ही मरणारी वसुंधरा स्वर्गाप्रमाणे सजवू शकू.**

पृथ्वी आजपर्यंतचं आयुष्य चार अब्ज वर्षे इतके आहे. गेल्या चारशे कोटी वर्षापासून ही वसुंधरा या ब्रम्हांडाच्या पसाऱ्या तेजस्वीपणे गिरक्या घेत आहे.या पृथ्वीर निसर्ग स्फूरला, बहरला,क्रमाक्रमाने विकसीत होत गेला.पाणी,हवा, जमीन,अग्नी व आकाश या महाभूतापासून चेतना घेवून पहिला एक पेशीय जन्माला आला.आमीबा पासून सुरू झालेला प्रवास आदमी पर्यंत येवून पोहचला.पृथ्वीवर अगोदर वनस्पतीचं स्वयंपोषी जग तयार झाला.मग या स्वयंपोषीवर आधारित परपोषी प्राणी जीव जन्माला आले.मुंगी पासून हत्ती पर्यत एक अफलातून जैवसाखळी निर्माण झाली.सगळेच एकमेंकावर अधारित आणि एकमेंकांना परस्परपुरक. माणूस हा जैवसाखळीतील सर्वांत विकसीत अशा ठिकाणावरील सर्वांत भाग्यवान असा जीव आहे.निसर्गातील सर्वांत जास्त मानसिक क्षमता असणारा हा जीव.जो पर्यंत निसर्गात माणूस नव्हता तो पर्यत निसर्ग साखळीत सगळे काही आलबेल व सुव्यवस्थीत होते.परंतु ज्या दिवशी माणूस जन्मला आला त्यादिवसापासून मरणाचा काऊंट डाऊन सुरू झाला आहे.कारण निर्सगाने बहाल केलेल्या अधिकच्या बुद्धीबळाचा वापर करून माणसाने निसर्गांच्या मर्यादा ओलांडून पुढे एक मानवी संस्कृती तयार केली.मानव सोडून निसर्गातील एकाही प्राण्याने वा पक्षाने आजपर्यंत निसर्गाची सीमा ओलांडलेली नाही.आणि माणसाने निर्सगाची मर्यादा पालनाचा एकही कटाक्ष कधीच पाळला नाही.आम्ही झाडे तोडत आहोत.खनिजांच्या हव्यासापोटी पृथ्वीचे पोट फाडून खनिजे काढत आहोत जल जमीन जंगल यांच्यावर अतिक्रमण करीत आहोत.वनसंपदा व प्राणीसंपदा यांच्यावर हल्ले चढवित आहोत.त्यातून मग अवर्षण, अतिवर्षा ,भूकंप,त्सुनामी,वादळ,असे भीषण प्रकार म्हणजे येणाऱ्या संकटांची नांदीच असूनही आम्ही गंभीर नाही आहोत. एक साधी प्लास्टिक पिशवी वापरू नये हे तत्व सुद्धा आम्ही सलग धड काही महिने पाळू शकत नाही.कळत असून ही माणसला वळत नाही.कारण मानवी संस्कृती नामक नरक व्यवस्थेत माणूस पापी जीवाप्रमाणे अडकला आहे.

माणसाने शेती करायला सुरूवात केली हे माणसाने निसर्गावर केलेले पहिले व्यापक अतिक्रमण होय.त्यानंतर औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या प्रदुषणाच्या भस्मासुराने वसुंधरेचा गळाच घोटला आहे.आज सगळया जगाचेच नागरीकरण होत असून माणूस आणि निसर्ग यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे.अधिकाधिक निसर्गविरोधी जगणं याला आम्ही मार्डन समजत आलो आहोत.आता तर विकासाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जनाच्या जीवघेण्या प्रयत्नामुळे आमची प्रिय वसुंधरा आम्ही उध्वस्त करायला निघालो आहोत.खरे आम्ही आता पृथ्वीवर विकासाच्या नावाखाली आठशे कोटी लोकांचे समाधीस्थळ निर्माण करीत आहोत.मानव जन्म हा निसर्गाने केलेला चमत्कार होता.तर संपूर्ण निसर्गमय वसुंधराच नष्ट करणे हा माणसाने केलेला चमत्कार ठरणार आहे.

**दोन धर्मामध्ये कधीच संघर्ष होत नसतो.सर्व धर्मांचा अधर्माबरोबरच संघर्ष होत असतो.**

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विश्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------

पत्ता :-------------------------------------------------

---------------------------------- पीनकोड

मोबाईल : | | | | | | | | | | |  | | | | | | | | | | |

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक | | | | | | | | |

व्यवसाय :------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : --------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-----------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर [ ] **कार्यालयीन उपयोगासाठी** मासिक वर्गणी नंबर [ ]

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------ / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये [ ] मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा -----------------------------------------------------------------------------

मनाला शक्ती मिळते ती परिश्रम केल्यामुळे ,आराम केल्यामुळे नव्हे.

सक्सेस स्टोरीज

# खराब काम करून ठेकेदार मस्त, प्रशासन सुस्त माहिती अधिकारामुळे पुन्हा झाला फुटपाथ दुरूस्त

मुंबईतील दादर टी-टी परिसरातील फुटपाथ दुरूस्तीचे व फुटपाथवर पेवर ब्लॉक लावण्याचे विकास काम मुंबई महानगर पालिकेच्या एफ वार्ड अंतर्गत काही दिवसापूर्वी पूर्ण करण्यात आले होते.दादर टी-टी हा वर्दळीचा भाग असून वाहनांची येथे मोठी ये-जा असते.त्यामुळे सामान्य पादचाऱ्यांना फूटपाथवरूनच चालावे लागते. हे फुटपाथ पेवर ब्लॉक टाकून बनविले यामुळे या ठिकाणी वरून रोज येणारे व जाणारे नागरिक सहाजिक खूष झाले.परंतु पादचाऱ्यांचा हा आनंद फार दिवस टिकला नाही.फुटपाथ बनवून १५-२० दिवस होत नाहीत तोच.फुटपाथवरील पेवर ब्लॉक वेगवेगळे होऊ लागले.बाहेर येऊ लागले.जनतेच्या करातून जमा केलेले लाखो रूपये खर्चून तयार केलेला फुटपाथ जर महिना-पंधरा दिवसातच खराब होऊ लागला तर विकासाच्या नावाखाली ही जनतेच्या पैशाची ठेकेदार व प्रशासनातील अधिकारी लोक चोरीच करीत आहेत.असाच त्याचा अर्थ होतो.ही बाब दादर परिसरात राहणारे माहिती अधिकार कार्यकर्ते भास्कर प्रभू आणि निखील देसाई यांना खटकली.

जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामाचा दर्जा असा खराब असेल तर मग विकास कामाचा उपयोग तरी काय ?आणि विकासाच्या नावाखाली जनतेच्या पैशावर कोण डल्ला मारीत आहे.याचा शोध घेतलाच पाहिजे असे या दोघा कार्यकर्त्यांना वाटले.आणि एके दिवशी वेळ काढून त्यांनी अशा सर्व विकास कामाचे सामाजिक मूल्यांकन झाले पाहिजे.असा विचार करून हे खराब विकास काम कोणत्या ठेकेदाराने केले ? या कामावर पाहणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेचा कोण इंजिनिअर नियुक्त होता. या फुटपाथच्या कामासाठी ठेकेदाराला किती रूपयांचे बील देण्यात आले. ठेकेदाराला वर्कऑर्डर दिली त्याला विकास कामाचा काय तपशील होता.

**नागरिक हक्काचा वसा घेऊन भ्रष्ट प्रवत्तीला चाप लावण्यासाठी एक छोटी कृती केली तरच प्रत्यक्षात फरक पडू शकतो.त्यामुळे केवळ बोलणारा नव्हे तर कृतिशील कार्यकर्ता ही काळाची गरज आहे**

तसेच प्रत्यक्षात कोणत्या प्रकारचे विकास काम झाले आहे.अशा साऱ्या प्रश्नांची तड लावण्यासाठी माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत वार्ड ऑफिसर कडें माहिती मागीतली.

अशी मागणी करताना वार्ड अधिकारी खडबडून जागे झाले आणि त्यांनी तातडीने सदर फुटपाथच्या विकास कामाची पाहणी केली.फुटपाथच्या पेवर ब्लाक च्या खाली ठेकेदाराने सिमेंटचा वापरच केला नव्हता हे दिसून आले.असे खराब काम करणाऱ्या ठेकेदाराला पुन्हा एकदा व्यवस्थीत काम पूर्ण करून देण्याचा आदेश काढण्यात आला.आणि ठेकेदाराने नाविलाजाने का होईना हे काम पुन्हा व्यवस्थीत करून दिले.सामान्य नागरिक जर सजग राहिले तर ठेकेदार किंवा प्रशासकीय अधिकारी चूकीचे काम करूच शकत नाहीत.आणि त्यांनी ते केलेच तर नागरीक अधिकारांची आयुधे वापरून नागरिक त्यांना योग्य ती दिशा देवू शकतात हेच या उदाहरणावरून दिसून येते.सदर प्रकरणात लक्ष घालणाऱ्या माहिती अधिकार मंच या संस्थेच्या श्री.भास्कर प्रभू व निखील देसाई यांचे अभिनंदन .आपल्या सारखे जागते रहो हा संदेश देणारे नागरिक समाजासाठी प्रेरणादायी कार्य करतात हे नक्कीच आशादायी आहे. त्यांच्या प्रमाणेच प्रत्येक माहिती अधिकार कार्यकर्त्यांने सजग राहावे हीच अपेक्षा

कोणत्याही सुखाच्या व विजयाच्या क्षणी आपण होश मध्ये असणं ही त्या क्षणाची अपूर्वाई असते.

ओळख कायद्याची

## वृक्षतोडणी /वृक्षांच्या फांदया तोडण्याबाबत महाराष्ट्र (नागरीक्षेत्र)

# झाडांचे जतन अधिनियम, १९७५



१) या अधिनियमानुसार महापालिका अधिकार क्षेत्रात वृक्ष प्राधिकरण ची स्थापना करणे बंधनकारक

२) खासगी जमीनीवरील किंवा सार्वजनिक जमीनी किंवा रस्त्यावरील झाडांच्या फांदया किंवा झाडे तोडण्यापूर्वी महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणे आवश्यक

३) या अर्जावर वृक्ष प्रधिकरण समितीच्या विचार सभेत निर्णय होण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहणीचा निर्णय.गांभीर्य, आवश्यकता यांची छाननी होवूनच झांड तोडणे किंवा फांदया तोडण्याबाबत परवानगी देण्याचा निर्णय घेणे आवश्यक.

४) झाडे तोडण्यापूर्वी सदर झाडे तोडण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाकडे परवानगी मागीतली असल्याचा पाटी सदर झाडावर सर्वांना दिसेल अशा पद्धतीने किमान दहा दिवस अगोदर लावणे आवश्यक

५) लेखी परवानगी नसताताना झाड तोडणे, फांदया तोडणे, साल काढणे, ॲसिड ओतणे, झाडाला इजा पोहचेल अशी आग लावणे किंवा अन्य प्रकारे इजा पोहचविणे अशी कृती करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा .त्यासाठी दंड, फौजदारी गुन्हा दाखल करणे, शिक्षा अशी तरतूद

६) प्रत्येक दहा वर्षाला कार्यक्षेत्रातील सर्व झाडांची गणणा करणे , गणनेचा विशेष रिपोर्ट जनतेसाठी उपलब्ध करून देणे महानगरपालिकांवर बंधनकारक

७) प्रत्येक वर्षी भाजी, फळे, फुले यांच्या झांडाच्या रंक्षणासाठी विशेष प्रदर्शनाचे आयोजनक करणे महापालिकासाठी बंधनकारक

८) वृक्षप्राधिकरण समितीमध्ये नगरसेवकांच्या शिवाय महानगरपालिका क्षेत्रातील किमान दोन पर्यावरण कार्यकर्ते किंवा पर्यावरणतज्ञांची प्रतिनिधी म्हणून नियुक्त करणे बंधनकारक

## महाराष्ट्र विघटनशील व अविघनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम १९८६

१) या अधिनियमानुसार पर्यावरणााला घातक ठरणाऱ्या अविघटनशील पदार्थांच्या वापरावर निर्बंध किंवा बंदी घालण्याचे अधिकार शासनांस प्राप्त झाले आहेत.

२) स्थानिक प्राधिकरणांचे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे कर्त्यव्ये व जबाबदाऱ्यांची निश्चिती.

३)विघटशील व अविघटनशील कचरा दोन वेगवेगळया कुडयातून जमा करणे सोसायटी व गृहनिर्माण संस्थांना, हॉटेल व वाणिज्य आस्थापना यांना बंधनकारक

४) महापालिका क्षेत्रात कचरा गोळा करणे तो वेगळा करणे त्याची साठवण करणे,त्याचे विलगीकरण करणे तो वाहून नेणे, त्याच्यावर प्रक्रिया करणे आणि त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे याची जबाबदारी नागरी स्थानिक स्वराज संस्थावर टाकण्यात आली आहे.

ओळख कायद्याची

# पर्यावरण विषयक महत्त्वाचे कायदे

दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुढाकाराने १९७६ मध्ये राज्यघटनेत ४२ वी घटनादुरूस्ती करण्यात येऊन यानुसार घटनेत ५१-अ व ४८ -अ हे अनुच्छेद नव्याने समाविष्ठ करण्यात आले. यापैकी ५१-अ अन्वये पर्यावरणाचे रक्षण करणे आणि पर्यावरणाच्या प्रतीमध्ये सुधारणा करणे हे भारताच्या प्रत्येक नागरिकांचे कर्त्यव्य आहे.पर्यावरणाच्या रक्षण करण्यासंबधी राज्यशासनावर अनुच्छेद ४८-अ अन्वये बंधनकारक करण्यात आले आहे.

या संबंधाने अधिक माहितीसाठी महत्वाच्या पर्यावरण विषयक कायद्यांची थोडक्यात ओळख.

## जल (प्रदूषण व नियंत्रण) अधिनियम,१९७४

संपूर्ण भारतात जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी समान कायदा असावा या उद्देशाने हा कायदा अस्तीत्वात आला.या कायद्यामध्ये सन१९७८ व १९८८ मध्ये विशेष सुधारणा करण्यात आल्या.या कायद्याची वैशिष्ठये पुढील प्रमाणे

१)१९८८ च्या सुधारणे नुसार प्रत्येक राज्यातील प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे राज्यातील सर्व नद्या,नाले, विहीरी व इतर जलप्रवाह यांचे आरोग्य अबाधित राखणे,सरंक्षण करणे व आवश्यक त्या सुधारणा करण्याची जबाबदारी आली आहे.

२)जलप्रवाहाच्या उगमस्थानी, प्रवाहाच्या काठावर कारखाना स्थापन करणे, चालविणे यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमतीपत्र घेणे बंधनकारक.

३)जल व पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही यासंबधीच्या सर्व कायदेशीर अटी व शर्थीचा संमतीपत्रामध्ये समावेश आवश्यक.कारखाना स्थापनकरण्यापूर्वीच संमतीपत्र घेणे जरूरीचे.

४)उद्योगातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर शुद्धीकरण यंत्रणा बसविण्याची जबाबदारी कारखानदारांची असते.कारखाना चालू करण्यापूर्वीच सांडपाण्यांच्या शुद्धीकरणाच्या मानकांचे प्रमाण प्राप्त करणे कारखानादारावर बंधनकारक.

५)कारखान्याला संमती देताना पर्यावरण सरंक्षण अधिनियम १९८६ चे पालन होत किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी संबधीत राज्यातील प्रदुषण नियंत्रण मडळाकडे निश्चित करण्यात आली आहे.

६)संमतीपत्रातील अटी व शर्थीचे पालन न केल्यास राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अशा कारखान्यातील सांडपाण्याच्या पृथ्थकरण अहवालावरून संबंधीत कारखान्यास प्रथम कारणे दाखवा नोटीस देवून पुढील कार्यवाही करते.

७) दोषी कारखान्याविरोधात मडळास न्यायालयामध्ये खटला दाखल करता येतो.१९८८ च्या सुधारित कायद्यानुसार असा खटला दाखल करण्याचे अधिकार हे सर्वसामान्यादेखील आहेत.कोणताही सामान्य नागरिक किंवा पर्यावरणवादी कार्यकर्ता संबंधीतांना ६० दिवसाची नोटीस देवून दोषी कारखान्याविरोधात न्यायालयात खटला दाखल करू शकतो.राज्य प्रदुषण मंडळाकडे मागणी केल्यास सदर कारखान्याचा प्रदुषण नियंत्रण अहवाल व इतर कागदपत्रे मडळांने अशा व्यक्तीस देणे हे मंडळावर बंधनकारक आहे.

८) त्वरीत कारवाईसाठी मंडळास विशेष अधिकार असतात.विहित मुदतीत प्रदुषण नियंत्रण यंत्रणा न बसविल्यास बँकेच्या हमीची रक्कम मंडळाकउे जमा करून घेण्याची कारवाई करता येते.

## पर्यावरण सरंक्षण अधिनियम १९८६

भोपाळ दुर्घटनेनंतर वेगवेगळया पर्यावरण कायद्यातील त्रूटी लक्षात घेऊन ससंदेने संपूर्ण भारतासाठी हा कायदा संमत केला आहे.या कायद्यान्वये धोकादायक घनकचरा ,जैववैधकिय कचरा, व पर्यावरणाच्या विविध घटकांच्या सरंक्षणासाठी विविध अधिसूचना प्रसृत करण्यात आल्या आहेत. त्या खालील प्रमाणे होत.(१) धोकादायक कचरा(व्यवस्थापन व हाताळणी ) नियम १९८९ (२) धोकादायक रसायने, उत्पादने साठवणूक व आयात नियम ,१९८९ (३)सूक्ष्मजीव, जैविक यांच्याशी संबंधीत उत्पादन,वापर, आयात व निर्यात आणि साठवणूक नियम १९८१ (४) जैववैधकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ (५) पुनर्चक्रित प्लास्टिक उत्पादन व वापर नियम,१९९९ (६) महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) अधिनियम २००६ इत्यादी अधिसूचना प्रसृत करण्यात आल्या.६) उद्योगधंदे किंवा प्रक्रियामुंळे होणारे नुकसान व त्यांचे दुष्परिणाम यांच्यापासून सर्वसामान्यांना नुकसान भरपाईसाठी सार्वजनिक दायित्व विमा कायदा ,१९९१ संमत. अशा कायद्याअंतर्गत जिल्हाधिकारी यांच्याकडे नुकसान भरपाईबाबत अर्ज करता येतो.

# तक्रार कोठे कराल?

### पर्यावरण विषयक तक्रारीसाठी

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
कल्पतरू पॉईन्ट,३ व ४ था मजला
सायन माटुंगा स्कीम रोड,नं.८
सायन (पूर्व) मुंबई४०० ०२२
फोन :(०२२)२४०१०४३७

### विजेच्या गंभीर प्रश्नाविषयी लिहा

विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
६०६,केशव,बांद्रा-कूर्ला संकूल
बांद्रा(पूर्व) मुंबई -५१
फोन : (०२२)२२०२२८५९

### मानव अधिकार हननाविषयक तक्रार असेल तर लिहा.

राज्य मानव अधिकार आयोग
९,हजारीमल सोमाणी मार्ग,सीएसटी
स्टेशनसमोर,मुंबई -४०० ००१
फोन :(०२२)२२०५०७५१

### महिलांवरील अत्याचारांच्या तक्रारीविषयी

राज्य महिला आयोग
गृहनिर्माण भवन (म्हाडा इमारत) पोटमाळा
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१
फोन : (०२२) २६५९०७३९ २६५९१५४१

### अल्पसंख्यांक कायदेविषयक तरतूदींच्या मागणीविषयी लिहा

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग
जे.जे.कला महाविद्यालयाच्या मागे,
बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग मुंबई ४०० ००१
फोन : (०२२) २६६१०१५६ २२६५००८५

### ग्राहक विषयक गंभीर तक्रारीविषयी लिहा

राज्य ग्राहक वादविवाद आयोग
रूम नं.१,५व ६ जूने प्रशासकीय महाविद्याल इमारत
हजारीमल सोमाणी मार्ग,सीएसटी स्टेशनसमोर
मुंबई-१
फोन (०२२)२२०७२०९७ २२०१८५३९
२२०५७४०९

### विधी व न्याय विषयक मागण्यासाठी

महाराष्ट्र राज्य विधी आयोग
बॅरेक नं.१३,फ्रिप्रेस जर्नल मार्ग मुंबई-२१
फोन (०२२)२२८८ ०५७९
२२८८०६७१

### उद्योग विषयक समस्या / तक्रारी विषयी

महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलमेंट कार्पोरेशन
मरोळ इंडस्ट्रीयल एरिया, उद्योग सारथी
महाकाली गुंफा रोड,अंधेरी (पूर्व)मुंबई-९३
फोन (०२२)२६८७ ००७३
२६८७ ००५२ २६८७ ०८००

अत्तराची बाटली संपतानाच जपायची असते.व.पु.काळे

# बेस्ट RTI कार्यकर्ता पुरस्कार - २०१२

आपण माहिती अधिकार कार्यकर्ते आहातच.महाराष्ट्रातील सर्वोत्तम कार्य केलेल्या आघाडीच्या २० कार्यकर्त्यांचा बेस्ट आरटीआय कार्यकर्ता पुरस्कार देवून गौरव केला जाणार आहे.सदर राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम मार्च २०१२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रम स्वराज बहुउद्देशीय संस्था तसेच मुंबई कार्यरत अन्य संस्थांकडून प्रायोजित होणार आहे.महाराष्ट्राच्या सर्वदूर व सर्व विभागात माहिती अधिकार वापरून प्रसंगी प्रस्थापितांच्या धमक्या व मार खाऊन,प्राणांची बाजी लावून उत्तम कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची सार्थ सन्मान होणे ही समाजाची गरज आहे या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी कार्यकर्त्यांनी संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई-९६ सेक्टर -१२ खारघर नवी मुंबई येथे आपण वर्षभर मागीतलेली माहिती,उघड केलेली भ्रष्टाचारांची प्रकरणे, व सलग्न माहिती पाठवावी ही विनंती.

## रेडिमेड प्रश्नावली

**माहिती अधिकारात सर्व सरकारी विभागांना कशी ,काय व कोणती माहिती मागावी ?**

**सरकारी कार्यालयातील वाहनांच्या वापर व गैरवापरांसबंधीची माहिती मागविण्यासाठी अर्ज नुमूना पान नं.१३वर**

**गावातील दारिद्रय रेषेखालील यादीची माहिती व लाभ विषयक माहिती साठी अर्ज नुमूना पान नं.१४ वर**

**आपल्या परिसरातील सरकारी रुग्णालयातील औषधसाठ्याची माहिती पान नं.१५ वर**

.सामाजिक कार्यकर्त,आरटीआय कार्यकर्त्यांनी आपले माहिती अधिकार वापरताना आलेले अनुभव,आपल्या सक्सेस स्टोरीज् तसेच त्यांनी वापरलेले प्रभावी अर्जाचे नमूने, माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय, अशा प्रकारातील लेख व अनुभव लिहून **नागरिक अधिकार** कडे पाठवावेत योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. मासिक नागरिक अधिकार हे माहिती अधिकारांचा वापर करून प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपले हक्कांचे व्यासपीठ असणार आहे.आपल्या हक्काचे हे व्यासपीठ बळकट करण्यासाठी आपण नक्की सहकार्य कराल हा विस्वास आहे.

सगळे कागद सारखेच,त्यांना अहंकार चिटकला की त्याचे सर्टिफिकेट होते. व.पु.काळे

# सरकारी कार्यालयातील वाहनांच्या वापर व गैरवापरांसबंधीची माहिती मागविण्यासाठी नमुना अर्ज

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

---------------

--------------------

१) अर्जदारांचे नाव ---------------------------------------------

२) पत्ता : --------------------------------------------------------

३) माहितीचा विषय : आपल्या शासकीय कार्यालयातील शासकीय वाहनांच्या विषयी माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)

अ) सन २०१० ते २०११ या दोन वर्षातील आपल्या कार्यालयात किती शासकीय वाहने वापरात आहेत त्या वाहनांचे नंबर त्यांची अनुषांगिक कागदपत्रे द्यावीत.

ब) या सर्व वापरात असणाऱ्या आणि नादुरूस्त अवस्थेत असलेल्या सर्व शासकीय वाहनांचे लॉगबूक ची छायांकित प्रत द्यावी.

क) आपल्या कार्यालयातील शासकीय वाहन / वाहनांचा वापर कोणते अधिकारी / लोकप्रतिनिधी करतात यांची सूची द्यावी.

ड) आपल्या कार्यालयातील वाहनांचा २०११ मध्ये प्रत्येक महिन्यास किती किलोमिटर वापर झाला.यासाठीइंधन किती लागले. या वाहनांची २०१० व २०११ या वर्षात किती वेळा दुरूस्ती झाली ?प्रत्येक वेळी दुरूस्तीवर किती रूपये खर्च झाले वाहने कोठे दुरूस्त करण्यात आली ? वाहन दुरूस्त करणाऱ्या गॅरेजच्या पावत्यांच्या छायांकित प्रती द्याव्यात.

इ) आपल्या कार्यालयातील शासकीय वाहनांच्या वापराविषयी शासकीय सूचना,अद्यादेश,कायदेशीर तरतूदी असणारे दस्त यांची प्रत्येकी एक प्रत द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

मो.:

परिक्षा म्हणजे स्वत:च्या आत डोकावून पाहण्याची संधी.

# शासकीय /पालिका रूग्णालयातील औषधसाठी तपासणी करण्यासाठी अर्जाचा नमूना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

शासकीय रूग्णालय/ नगरपालिका रूग्णालय

-----------------------------------

१) अर्जदारांचे नाव ---------------------------------------------

२) पत्ता : ----------------------------------------------------

३) माहितीचा विषय : आपल्या शासकीय / पालिका रूग्णालयातील औषधसाठया विषयीची माहिती मिळणेबाबत

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)

अ) सन २०१० व सन २०११ मध्ये आपल्या शासकीय रूग्णालयात आलेल्या एकूण औषध साठयांची नोंदी असलेल्या नोंदवही / रजिस्टर च्या छायांकित प्रती द्याव्यात. स्टॉक रजिस्टरच्या छायांकीत प्रती द्याव्यात.

ब) आपल्या शासकीय /पालीका रूग्णालयात आपल्या कोणत्या वरीष्ठ कार्यालयाकडून औषधे खरेदी करून पाठविली जातात. सदर कार्यालयाचे नाव तसेच औषध खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा द्यावा.

क) औषधे पुरवठा करणाऱ्या औषध कंपन्यानी / वितरकांनी आपल्या कार्यालयाशी औषध खरेदीबाबत चा नियम व नियमावलीचा केलेला करार याची एक प्रत द्यावी

ड) आपल्या शासकीय दवाखान्यातून २०११ मध्ये किती रूग्णांना मोफत औषधे देण्यात आली ?. औषध दिलेल्या रूग्णांचे नाव व पत्ता ओषधाचा तपशील यांची नोंद असणाऱ्या रजिस्टरची छायांकित प्रत द्यावी.प्रत्येक महिन्यांचा अहवाल देणे

ई) रूग्णांना मोफत औषधे देण्याविषयी काय नियम आहेत त्याची एक प्रत द्यावी

फ) आपल्या रूग्णालयातील औषध साठा सांभाळणे औषधसाठयाविषयी अद्यावत माहिती ठेवणे याची जबाबदारीकोणाकडे आहे संबंधीत अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा द्यावा.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही

(नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : -------------------- (नाव ----------------)

मो.:

आपल्या सवयी आपल्यावर राज्य करतात.

# गावातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची व मिळालेल्या मदतीची माहिती मागविण्यासाठी अर्जाचा नमुना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

गट विकास अधिकारी

----------------------------------

१) अर्जदारांचे नाव ------------------------------------------

२) पत्ता : -------------------------------------------------

३) माहितीचा विषय :---------------- गावातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची व त्यांना मिळालेल्या लाभ / मदतीची माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)

अ) सन २०१० व सन २०११ मध्ये आपल्या कार्यालयातील अद्यावयात नोंदी प्रमाणे ------------------ या गावातील दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या कुटुंबांची यादी देणे

ब) आपल्या कार्यायातून दारिद्र्य रेषेखालील मंडळीना कोणकोणत्या योजनद्वारे काया काय मदत व लाभ मिळतात याची यादी द्यावी.

क) ------------ या गावातील किती दाग्रिदया रेषेखालील कुटुंबाना कोणत्या योजनेखाली काय लाभ किंवा मदत मिळाली याचा तपशील द्यावा.सन २०१० व २०११ मधील माहिती द्यावी.

ड ) ------------- या गावातील दारिद्र्य रेषेखाली कुटुंबाची यादी बनविण्यासाठी कधी सर्व्हे झाला होता ? सर्व्हे करणाऱ्या शासकीय कर्मचारी / अधिकारी यांचे नाव व हुददा द्यावा.

इ) संबधीत सर्व्हे नंतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादीचे पूर्ननिरिक्षण किवां पुर्नपरिक्षण कधी व केव्हा झाले आहे ? असल्यास यासंबधीची माहिती द्यावी.

फ) दारिद्र्य रेषेखालील यादी ठरविण्याविषयी शासनानेच काय नियम निकष व तरतूदी आहेत.या विषयी शासनाचा अद्यादेश परिपत्रक व कायदेशीर कागदपत्रांच्या छायांकित प्रती द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

मो.:

शेवटचे पान ..

# प्रेरणा

## शेतकरी गीत

ऊठ मर्दा ऊठ ,आवळून घे मुठ
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट
सत्तेपुढे शहाणपण,जेव्हा व्यर्थ जाते
माणूसकीचे लचके तोडून ,लाचखोर खाते
पौरूष्याचे नशेचे लाव दोन घूट
अन् .. हाण त्यांच्या टाळक्यात, पायामधला बूट
अन्यायांची सीमा जेव्हा, मर्यादेला लांघते
तुझे हक्क तूडवून,तिरडीवर बांधते
शेपटी तेव्हा खाली नको, वाघा सारखा ऊठ
अन् .. हाण त्यांच्या टाळक्यात, पायामधला बूट
पोशिंद्याच्या छाताडावर,हरामीच्या मौजा
तेव्हा राज्य करतात,लूटारूंच्या फौजा
सत्ता आणि दलालांची कर ताटातूट
अन् .. हाण त्यांच्या टाळक्यात, पायामधला बूट
माय तुझी बैलावाणी,राबराबून मेली
गल्ली मध्ये मूळ आणि दिल्ली मध्ये वेली
अभयाने शोध घे, कोणी केली लूट
अन् .. हाण त्यांच्या टाळक्यात, पायामधला बूट

**कवी : गंगाधर मुटे**

**साभार** :www.baliraja.com

प्रति,

BOOK-POST

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३४५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
MAHMAR39311/13/1/2011TC